पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १५

**सभावृत्तांत**

दिनांक - **११/०१/२०१९** वेळ - दुपारी **४.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **११/०१/२०१९** रोजी दुपारी **४.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**

२. मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

३. मा.मुंढे उषा अंकुश

४. मा.वैशाली जालिंदर काळभोर

या शिवाय मा.झगडे- सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक १) राजस्थान अभ्यास दौ-याबाबत - मा.उषा मुंढे , मा.हिराबाई घुले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक २) प्रभाग क्र.१३ मधील महिला बचत गटांसाठी मार्गदर्शन प्रदर्शन व शिबीर यासाठी मंडप व्यवस्थेबाबत - मा.हिराबाई घुले , मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव

---------

दिनांक १९/१२/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १४) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक - ०१

दिनांक – ११/०१/२०१९

सुचक : मा.उषा मुंढे अनुमोदक : मा.हिराबाई घुले

संदर्भ : मा.उषा मुंढे, मा.हिराबाई घुले यांचा प्रस्ताव –

महिला व बालकल्याण समिती सदस्य यांच्यासाठी राजस्थान दौरा पवनाथडी २०१८-१९ चे आयोजन दि.०४/०१/२०१९ ते दि.०८/०१/२०१९ दरम्यान करण्यात आल्या कारणाने सदर कालावधीत राज्यस्थान अभ्यास दौ-याचे आयोजन करणे शक्य झाले नाही. तरी या दौ-याचे

आयोजन माहे जानेवारी २०१९ मध्ये शेवटच्या आठवडयात/फेब्रुवारी २०१९ चे पहिल्या आठवडयात अंदाजे ६ दिवसांसाठी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक - ०२

दिनांक – ११/०१/२०१९

सुचक : मा.हिराबाई घुले अनुमोदक : मा.उषा मुंढे

संदर्भ : मा.हिराबाई घुले, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.१३ मध्ये महिला बचत गटांसाठी मार्गदर्श, प्रदर्शन, विक्री व शिबीराचे आयोजन दि.१२,१३, व १४ जानेवारी,२०१९ या कालावधीत केलेले आहे. त्यासाठी लागणारी मंडप, विद्युत व साऊंड व्यवस्था उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२८/२०१९
दिनांक : ११/०१/२०१९

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.